निवडक महाराष्ट्र

ध्रुव ग्लोबल स्कूलच्या वतीने हार्मोनी स्पोर्ट्स ॲण्ड आर्ट फेस्टचे आयोजन

पुणे : विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासात सामजस्यः क्रीडा आणि कला महत्वाची भूमिका बजावते. ही सामायिक दृष्टी, मूल्ये, पद्धती आणि निश्चित ध्येय प्रतिबिंबित करते. हाच मुख्य उद्देश ठेऊन मालपाणी फाउंडेशनच्या उंड्री येथील ध्रुव ग्लोबल स्कूलतर्फे 'हार्मोनीः स्पोर्टस ॲण्ड आर्ट फेस्ट २०२३-२४' चे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव १ ते ३ नोव्हेंबर २०२३ रोजी उंड्री येथील स्कूलमध्ये संपन्न होणार आहे. अशी माहिती स्कूलच्या संचालिका अनिष्का यश मालपाणी व स्कूलच्या प्राचार्या शारदा राव यांनी दिली. या महोत्सवाचा उद्घाटन समारंभ १ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वा. होणार आहे. तसेच बक्षीस वितरण म्हणजेच महोत्सवाचा समारोप समारंभ ३ नोव्हेंबर रोजी होईल. आयोजित अंतर शालेय महोत्सवात पुणे विभागातील २८ शाळेतील ७०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. यात स्वीमिंग, योगा, बॅडमिंटन, फूटबॉल, बास्केट बॉल, आर्ट, डान्स, म्यूझीक या स्पर्धा तीन दिवसात संपन्न होणार आहेत. हा महोत्सव एकतेच्या सहकार्यावर आणि विविध कला गुणांच्या एकत्रिकरणावर भर देणारा आहे.

कोरेगावमध्ये गॅसगळतीमुळे सिलिंडरचा स्फोट

कराड : शहरातील मुजावर कॉलनीमध्ये स्फोट होऊन त्यामध्ये ९ जण गंभीर जखमी झाल्याची घटना ताजी असतानाच कोरेगाव शहरातील गणेशनगर येथे पवार कुटुंबीयांच्या पत्र्याच्या शेडमध्ये सोमवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास घरगुती गॅस सिलिंडरचा गळती होऊन त्यानंतर पसरलेल्या गॅसने पेट घेत लागलेल्या आगीने क्षणातच रौद्ररुप धारण केले. या आगीत गॅस सिलिंडरचा स्फोट झाल्याने संपूर्ण संसारच जळून खाक झाला. सुदैवाने जीवितहानी झाली नाही, अथवा एकही जखमी झाले नाही. रहिमतपूर नगरपालिकेच्या अग्निशामक बंबासह कोरेगाव नगरपंचायतीच्या पाण्याच्या टँकरने आग आटोक्यात आणण्यात आली. कोरेगाव शहरातील गणेशनगर येथे दिलीप पवार वास्तव्यास आहेत. सोमवारी रात्री स्वयंपाक सुरू असताना गॅस सिलिंडरच्या रबरी पाईपमधून गॅस गळती सुरू झाली होती; मात्र ही बाब कुटुंबातील कोणाच्याच लक्षात आली नाही. त्यामुळे गळती झालेल्या गॅसने अचानक पेट घेत आग लागली.

साताऱ्यामध्ये बंदला १०० टक्के प्रतिसाद

कराड : मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी सातारा जिल्ह्यामध्ये पुकारण्यात आलेल्या मराठा क्रांती मोर्चाच्या सातारा बंदला आज शंभर टक्के प्रतिसाद मिळाला.मराठा आरक्षणाचा मुद्दा मोठ्या प्रमाणावर पेटला असताना सातारा जिल्ह्यातील मराठा बांधवांनी ही बंदची हाक दिली होती.त्याला पूर्ण प्रतिसाद देत सातारकरांनी आपले व्यवहार बंद केले होते.सातारा शहरांमध्ये तुरळक वाहतूक वगळता सर्व जनजीवन अक्षरशः ठप्प झाल्याचे दिसून येत होते.

मराठानगरमध्ये महिलांचे उपोषण

खटाव तालुक्यातील मराठानगर येथे शनिवारपासून मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी महिलांनी साखळी उपोषण सुरू केले आहे. धोंडेवाडीकरांनी इथून पुढे येणाऱ्या निवडणुकांसाठी मतदानावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे, तर पाचवड गावात सर्वपक्षीय नेत्यांना गावबंदी केली आहे. मराठा समाजाचे आरक्षण मागणीच्या आंदोलनाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे. ग्रामीण भागामध्ये ही या आंदोलनास सुरुवात झाली आहे. ग्रामीण भागात हे आंदोलन शांततेत सुरू असले, तरी मराठानगर (गुंठेवारी) येथील मराठा समाजातील महिलांनी शनिवारपासून साखळी उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. धोंडेवाडी ग्रामस्थांनी आगामी काळात येणाऱ्या निवडणुकीपूर्वी मराठा समाजाला आरक्षण मिळाले नाही, तर या निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय तसेच गावामध्ये नेत्यांना बंदी घातल्याचे निवेदन प्रशासनाला दिले आहे. पाचवड येथील सकल मराठा समाजाकडून आमदार, खासदारांसह व सर्वपक्षीय नेत्यांना आरक्षण मिळेपर्यंत गाव बंदींचा निर्णय घेतला.

नांदेड शहरात कडकडीत बंद

नांदेड : सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे, मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणास पाठिंबा म्हणून नांदेड शहरात मंगळवारी बंद पाळण्यात आला. बंदला चांगला प्रतिसाद मिळाला. शहरातील प्रमुख बाजारपेठ बंद होती. बंद दरम्यान शहरात दोन ठिकाणी दगडफोडीच्या किरकोळ घटना घडल्या. यशिवाय रास्ता रोको, टायर जाळणे आदी आंदोलनही करण्यात आले. सकल मराठा समाजाच्या बांधवानी गटागटाने दुचाकीवर फिरून शहरातील बाजारपेठ बंद ठेवण्यात भाग पाडले. शहरातील शिवाजीनगर, श्रीनगर, वजिराबाद, जुना मोंढा, आनंदनगर, वर्कशॉप, तरोडा बू. खुर्द आदी भागात कडकडीत बंद पाळण्यात आला. दिवसभर किरकोळ वाहतूक सुरू होती. बसेस मात्र बाहेरगावी पाठविण्यात आल्या नाहीत. मंगळवारी बंद दरम्यान शिवाजीनगर येथील एका चपला बुटाच्या दुकानावर तसेच कला मंदिर येथे एका थंडपेय विक्रीच्या दुकानावर दगडफेकीच्या घटना घडल्या आहेत. बंद दरम्यान दोन्ही दुकाने उघडी ठेवल्याने आंदोलक चिडले होते. यावेळी विविध घोषणा देण्यात आल्या.

विद्यार्थ्यांचा कुलगुरूंना घेराव

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थी व संशोधक विद्यार्थी यांच्यावतीने मनोज जरांगे यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा म्हणून मंगळवारी आमरण उपोषण आणि साखळी उपोषणाला सुरूवात करण्यात आली. यावेळी मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर विद्यार्थ्यांनी एकत्र येत संवैधानिक घोषणा देत ठिय्या मांडला. महाराष्ट्रात सर्वप्रथम विद्यापिठ स्तरावर लढा उभारला व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व्यवस्थापन समिती बैठकीत मराठा आरक्षण अंदोलनावर ठराव मांडला व तो मुख्यमंत्री राज्यपाल यांच्याकडे पाठपुरावा करण्यास भाग पाडले.

मातोश्रीवरील नवान्नतोरण बांधण्याची ३० वर्षांची परंपरा कायम

अलिबाग : निसर्गाबद्दल वाटणाऱ्या कृतज्ञतेपोटी कोकणात नवान्न पौर्णिमा साजरी करण्याची प्रथा आहे. या नवान्न पौर्णिमा दिवशीचे औचीत्य साधून गेली ३० वर्षाची परंपरा जोपासून जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांनी शिवसेना पक्षप्रमुख यांच्या निवासस्थांनी तमाम शिवसैनिकांचे ऊर्जास्रोत मातोश्री येथे नवान्नतोरण बांधले. सुमारे ६० इंच लांबीचे भाताच्या लोंबीचे असलेले हे तोरण असते. गणपतीनंतर कमी कालावधीत तयार होणाऱ्या पिकांची कापणी केली जाते. भात हे त्यापैकी एक धान्य! नवरात्रीत नुकताच कापणी करून आलेला भात जेवणात घेण्यापूर्वी किंवा बाजारात विकायला नेण्यापूर्वी देवाला त्याच तांदूळाचा भात किंवा खीर असा नैवेद्य केला जातो. त्याची पूजा केली जाते. म्हणून दसऱ्यालाही भाताच्या लोम्बी तोरणात अडकवून ते वैभवाचे प्रतीक म्हणून मानले जाते. आश्विन महिन्यात मध्यरात्रीला असणाऱ्या पौर्णिमेला कोजागीरी पौर्णिमा म्हणतात. तशी पौर्णिमा आली नाही तर दुसऱ्या दिवशीच्या पौर्णिमेला कोजागीरी पौर्णिमा समजले जाते. ज्या दिवशी पौर्णिमा पूर्ण होत असेल त्या दिवशी नवान्न पौर्णिमा साजरी केली जाते.

नवीन धान्याची पूजा

नवान्न पौर्णिमेच्या दिवशी घरांघरांत नवीन धान्य आलेले असते. भात, नाचणी, वरी आदी प्रकारच्या धान्याची एकप्रकारे पूजा करण्याचा दिवस म्हणजे नवान्न पौर्णिमा. या दिवशी नवीन तांदळाचा भात, खीर करण्याची प्रथा आहे. पक्वान्न म्हणून नवीन तांदळाच्या पिठाचे पातोळेही केले जातात.

इतिहासाच्या डोळसपणे अभ्यासातूनच वास्तवाची मांडणी शक्य -डॉ. सोमनाथ रोडे

नांदेड : इतिहासामध्ये एखाद्या घटनेबद्दल अभ्यासकांची अनेक मतमतांतरे दिसून येतात; परंतु पुराव्याच्या आधारे इतिहासाच्या डोळसपणे अभ्यासातूनच वास्तवाची मांडणी शक्य असल्याचे उद्गार इतिहासाचे गाढे अभ्यासक डॉ. सोमनाथ रोडे यांनी व्यक्त केले. श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित यशवंत महाविद्यालयात प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन.शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार पदवी, पदव्युत्तर इतिहास विभाग व संशोधन केंद्राच्या वतीने आयोजित इतिहास अभ्यास मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी ते सोमवारी (दि. ३०) बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. कविता सोनकांबळे होत्या. यावेळी इतिहास विभागप्रमुख डॉ. शिवराज बोकडे, डॉ.संगीता शिंदे, डॉ. साईनाथ बिंदगे, प्रा. राजश्री जी.भोपाळे, प्रा. एन.डी. आंबोरे, प्रा. शितल सावंत यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. साईनाथ रोडे म्हणाले की, इतिहास संशोधकांनी सत्याचा विपर्यास न करता वास्तववादी इतिहास मांडण्याकडेच त्याचा कल असला पाहिजे; कारण इतिहासकार हा समाजाला इतिहासातून दृष्टी देण्याचं काम करत असतो.

केनरा बैंक Canara Bank
सिंडिकेट Syndicate

आर ॲण्ड एल सेक्शन रिजनल ऑफिस ठाणे
दोस्ती पिनॅकल, प्लॉट क्र. १०४ आणि १०५, पहिला मजला, रोड नं.२२, न्यू पासपोर्ट ऑफिसच्या वर, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे पश्चिम - ४००६०४, ईमेल : recoveryrothane@canarabank

ई-लिलाव दिनांकित ३०.११.२०२३

मे. सुपर पोटॅटो ट्रेडर्स मालक : सुजाता विजय हांडे यांच्या मिळकत प्र. ५ चा ३०.११.२०२३ रोजी होणारा ई-लिलाव तांत्रिक कारणांमुळे मागे घेण्यात येत आहे. सदर मिळकत आता लिलावात नवसेल आणि या मिळकतीच्या संदर्भातील कोणत्याही बोली स्वीकारल्या जाणार नाहीत. हे तुमच्या माहितीसाठी आहे.

सही/-
दिनांक : ०१.११.२०२३ — प्राधिकृत अधिकारी
ठिकाण : ठाणे — कॅनरा बँक

जीवनाधार फाऊंडेशनचा मुंबै महोत्सव

मुंबई : गेली ६ वर्षे मुंबईच्या सांस्कृतिक इतिहासात महत्वाचे स्थान निर्माण केलेल्या जीवनाधार फाउंडेशनचा 'मुंबै महोत्सव' ३१ डिसेंबर ते ४ जानेवारी या कालावधीत मुंबईतील ५ ठिकाणी साजरा होत असल्याची घोषणा जीवनाधार फाउंडेशनचे अध्यक्ष राजेश खाडे यांनी केली आहे.

२०१७ पासून सुरू झालेल्या 'मुंबै महोत्सवा'चे हे ७ वे वर्ष आहे. मुंबईच्या नावलौकिकात भर टाकणाऱ्या व्यक्ती, समाजाला स्फूर्तीदायी असे वेगळे काम करणाऱ्या व्यक्ती यांना या महोत्सवामध्ये पुरस्कार प्रदान करण्यात येतात. १६ विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींना 'मुंबै गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात येते, तर 'मुंबै भूषण', जीवनाधार जावनगौरव पुरस्कार, मुलखावेगळी माणसं आणि सामाजिक कृतज्ञता सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात येतात. क्रिडा, सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, उद्योग, नाटक, चित्रपट, मालिका, साहित्य, शिल्प, चित्र, पत्रकारिता, संगीत, विज्ञान, राजकारण, आध्यात्म अशा क्षेत्रांचा यामध्ये सामावेश आहे.

आजवर डॉ. अमोल कोल्हे, अभिनेत्री उर्मिला मातोंडकर, ऋतुजा बागवे, पत्रकार सचिन परब, पोलीस महानिरीक्षक कृष्णप्रकाश, ऍडगुरु भरत दाभोळकर, अभिनेते अरुण नलावडे, डॉ. शैलेश नाडकर्णी, वृत्तनिवेदक मंदार फणसे, अलका कुबल, सयाजी शिंदे, महानगरपालिका आयुक्त इक्बालसिंह चहल, माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी, अभिनेत्री आयेशा झुल्का, प्रख्यात कायदेतज्ज्ञ अॅड. उज्वल निकम, ज्येष्ठ दिग्दर्शक व संकलक विवेक देशपांडे, कुहू भोसले आदींसह अनेक मान्यवरांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत. या वर्षीचा 'मुंबै महोत्सव' ३१ डिसेंबर २०२३ ते ४ जानेवारी २०२४ या कालावधीत जुहू, अंधेरी, दादर, विलेपार्ले आणि बोरीवली या ठिकाणी विविध कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. पर्यावरणपूरक सायकल रॅली, मराठमोळा फॅशन शो यासह हिंदी-मराठी गाण्यांचा वाद्यवृंद, शाहीरी, महाराष्ट्राची पारंपरिक लावणी, लोककलांचा आविष्कार, खाद्यजत्रा अशा अनेक कार्यक्रमांचा महोत्सवामध्ये सामावेश आहे.

फरार माजी नगरसेवक सुनील तेलनाडे न्यायालयात शरण

इचलकरंजी : विविध पोलीस ठाण्यात गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असलेला आणि तब्बल साडेचार वर्ष फरारी असलेला मोक्का अंतर्गत कारवाई केलेला एस. टी. सरकार गँगमधील माजी नगरसेवक सुनिल शंकरराव तेलनाडे हा सोमवारी येथील विशेष मोक्का न्यायालयासमोर शरण आला. न्यायालयाने त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली आहे. दरम्यान, जामिन संदर्भात केलेल्या सुनिल तेलनाडे याच्या अर्जावर २ नोव्हेंबर रोजी सुनावणी होणार आहे. सुनिल तेलनाडे हा न्यायालयात हजर झाल्याची माहिती समजताचा मोठ्या संख्येने तेलनाडे समर्थकांसह नागरिकांनी न्यायालय परिसरास मोठी गर्दी केली होती.

PUBLIC NOTICE

Notice is hereby given on behalf of our Client Mr. Naeem Dawood Kazi & Mr. Dawood Umar Kazi, owners of Flat B/302, Nutan Sneha Nagar Co-Op Hsg. Soc. Ltd., Nutan sneha Nagar, Nilemore, Nalasopara (W) has lost his original share certificate no.14, Distinctive No. 66 to 70 and he claim for duplicate share certificate in the society. If any one finds it or having any claim, right, title and interest and / or objection should contact at below address within 15 days of publication of this notice.

Date:01.11.2023 — **Alpha & Associates**
Advocates and Legal Advisors
12, Dange Tower, Opp. IDBI Bank, Nalasopara(W). Tal Vasai, Dist Palghar 401203

जाहीर सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की, श्री. त्रिविक्रम कृष्णमूर्ती अय्यर यांनी अझिझ बाग, माहूल रोड, वाशी नाका, चेंबूर, मुंबई ४०००७४ येथील सीता प्रिमायसेस लि.च्या पहिल्या मजल्यावरील युनिट बी७ई असलेल्या स्थावर मिळकतीची मूळ कागदपत्रे (१८.०२.१९९५ दिनांकित युनिट क्र. ७ईचे हस्तांतरिती त्रिविक्रम अय्यर आणि हस्तांतरक संजय बाफना यांच्यातील एओए, ०१.१०.१९९७ दिनांकित युनिट क्र. ७ ईचे विक्रेता म्हणून संजय बाफना कन्फर्मर म्हणून त्रिविक्रम अय्यर यांच्यातील कन्फर्मेशन डीड, एसआरओची ०३.१०.१९८७ दिनांकित नोंदणी पावती, १९.११.१९९४ दिनांकित संजय बाफना यांचे त्रिविक्रम अय्यर यांच्या नावावर योग्य प्रकारे हस्तांतरित केलेले शेअर प्रमाणपत्र क्र. २२८ आणि मिळकतीच्या दस्तावेजांच्या सत्यप्रती) कर्ज सुविधा क्र. एबीएफएलएमयूएमएलएपी ६५२१९ संदर्भात तारण म्हणून आदित्य बिर्ला फायनान्स लि.कडे जमा केली होती.

मे. आदित्य बिर्ला फायनान्स लि.ने आपले सर्व रेकॉर्डस् आणि कार्यालय यांत शोध घेऊनही वरील उल्लेखित दस्तावेज सापडू शकलेला नाही.

मे. आदित्य बिर्ला फायनान्स लि. आश्वासित करते की, मे. आदित्य बिर्ला फायनान्स लि. ला हरवलेले दस्तावेज सापडल्यास ते मे. आदित्य बिर्ला फायनान्स लि. श्री. त्रिविक्रम कृष्णमूर्ती अय्यर यांना परत करेल.

सही / -
दिनांक : ०१/११/२०२३ — प्राधिकृत अधिकारी
ठिकाण : मुंबई — आदित्य बिर्ला फायनान्स लि.

जाहीर सूचना

हे सर्वसामान्य जनतेला कळविण्यात येते की मयत श्री. दिलीप गोरधनदास गोंडालिया, फ्लॅट क्र. ७१, ७वा मजला, तद महा गुलेस्तान को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., ३४, भुलाभाई देसाई रोड, मुंबई - ४०००२६ येथे स्थित धारक मूळ शेअर प्रमाणपत्र क्र. २० असलेले ५ शेअर्स चे रु. ५०/- प्रत्येकी विभिन्न क्र. ९६ ते १०० (दोन्ही समाविष्ट) गहाळ/हरविलेले आहे. मयत श्री. दिलीप गोरधनदास गोंडलिया यांच्या कुटुंबीयंकडून प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र देण्यासाठी सोसायटीकडे अर्ज प्राप्त केला आहे.

याद्वारे सोसायटी दावे आणि हरकती मागवते, जर काही असतील तर, ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत दाव्याचे समर्थन करणारे संबंधित पुरावे व कागदपत्रांसह प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र देण्यासाठी दी महा गुलेस्तान को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., गूलेस्तान, ३४, भुलाभाई देसाई रोड, मुंबई-४०००२६ येथे संपर्क साधवा. वरील मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास सोसायटी उपविधित विहित पद्धतीने प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र देण्यास मोकळी असेल.

दी महा गुलेस्तान को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. साठी
सही/-
(कुशरू पी. श्रॉफ)
माननीय सचिव

सही/-
(रितूप्रकाश देसाई)
अध्यक्ष

जाहीर सूचना

सनतेस सूचना याद्वारे देण्यात येते की, कामनवाला चेंबर्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., कामनवाला चेंबर्स, सर पी. मेहता रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ मधील चौथ्या मजल्यावर कार्यालय क्र. ७ संबंधित श्री. राजू कुकरा शेट्टी द्वारा धारण केलेल्या विभिन्न क्र. १११ ते ११५ (दोन्ही समाविष्ट) प्रत्येकी रू. ५० चे पाच शेअर्स धारक मूळ शेअर प्रमाणपत्र क्र.२२ हरविलेले / गहाळ झालेले आहेत. श्री. राजू कुकरा शेट्टी यांचे २३ ऑगस्ट २०१२ रोजी निधन झाले. सोसायटीकडे कायदेशीर वारसदार श्री. रवींद्रनाथ राजू शेट्टी यांच्याकडून प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र जारी करण्यासाठी एक अर्ज प्राप्त झाला आहे.

सोसायटी याद्वारे कामनवाला चेंबर्स, सर पी. मेहता रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ च्या सोसायटी कार्यालयामध्ये दाव्यांच्या पुष्ठ्यर्थ संबंधित पुरावे आणि दस्तावेजांसह या सूचनेच्या प्रसिध्दीच्या तारखेपासून व १४ (चौदा) दिवसांच्या आत प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र जारी करण्यासाठी दावे आणि आक्षेप, काही असल्यास, मागवित आहे. जर वरील नमूद कालावधीत कोणतेही आक्षेप प्राप्त न झाल्यास सोसायटी उपविधीमध्ये विहित पध्दतीनुसार प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र जारी करण्यासाठी मोकळी असेल.

कामनवाला चेंबर्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. साठी
(आर. के. चौधरी)
मान. सचिव.

मुंबई येथील न्यायाधिकारितेच्या उच्च न्यायालयात
सर्वसाधारण मूळ दिवाणी अधिकारिता
कंपनी याचिका क्र. 507 सन 2002 मधील
ओएलआर क्र. 140 सन 2023
कंपनी अधिनियम, I सन 1956 च्या प्रकरणात; आणि
हनुमान व्हिटॅमिन फूडस लि. (दिवाळखोरीत) च्या प्रकणात
ई-लिलावामार्फत हनुमान व्हिटॅमिन फूडस लि. (दिवाळीखोरीतील) चे परिसमापक म्हणून अधिकृत परिसमापक, उच्च न्यायालय, मुंबई यांच्याद्वारे जंगम मत्तेच्या विक्रीकरिता सूचना

1. अधिकृत परिसमापक अहवाल क्र. 140 सन 2023 वर स्थावर आणि सन्मानिनीय उच्च न्यायालय, मुंबई यांनी मंजुर केलेल्या 20.10.2023 रोजीच्या आदेशाला अनुसरून हनुमान व्हिटॅमिन फूडर्स लिमिटेड (दिवाळखोरीतील) च्या मालकीच्या खालील स्थावर आणि जंगम मत्ता खरेदीकरिता इच्छुक खरेदीदारांकडून प्रस्ताव/बोली मागविण्यात येत आहेत, ज्याचा तपशील खाली दिलेला आहे. विक्री **''जे आहे जेथे आहे'' आणि जे काही आहे तेथे आहे तत्वाने''** आणि त्याची वेबसाईट **https://olauction.enivida.com** वर रेल्वे मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत विक्री एजंटचे नाव मे. रेलटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड, मिनिरत्न सेंट्रल गव्हर्मेंट (पीएसयु) द्वारे करण्यासाठी ई-लिलावामार्फत स्पर्धात्मक बोली मागवून वस्तुसूचीनुसार करण्यात येईल **आणि यांच्याकडुन सुध्दा मदत घेवु शकता :- आशुतोष कुमार 9355030621, अमरेंद्र कुमार 8448288980 आणि नवनीत मिश्रा 9355030630.** इच्छुक खरेदीदारांनी इसारा अनामत रक्कम ऑनलाईन सादर करण्याच्या अंतिम तारखेस किंवा पूर्वी स्वत:ची नोंदणी करायची आहे. विक्री सन्माननीय उच्च न्यायालय मुंबई (ई-लिलावामार्फत) यांच्या निश्चितीच्या अधीन राहील. स्थावर आणि जंगम मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

संच क्र.	मत्तांचे तपशिल	एरिया	इअर (रू.)	निरीक्षण
I	**स्थावर मत्ता म्हणजेच गट क्र. 37, जुना सर्व्हे क्र. 13, हिस्सा क्र. 1 जानुना गावाच्या हद्दीतील, तालुका-खामगाव, जि. बुलढाणा-444303**	14000 चौ.मी.	15 लाख	21.11.2023 रोजी स. 11.00 ते सं. 4.00 दरम्यान
II	**स्थावर मत्ता म्हणजेच गट क्र. 38, जुना सर्व्हे क्र. 13, हिस्सा क्र. 1 जानुना गावाच्या हद्दीतील, तालुका-खामगाव, जि. बुलढाणा-444303**	14000 चौ.मी.	25 लाख	
	गट क्र. 38 येथे स्थित व्हॅल्युअर टेक्नीकल रिपोर्ट टेबल-3 मध्ये वर्णन केलेल्या फॅक्टरी आणि अन्य जंगम असलेल्या 1970-72 मध्ये बांधलेल्या सर्व इमारती/ बांधकामे/शेडस			

2. गट क्र. 37, जुना सर्व्हे क्र. 13, हिस्सा क्र. 1, जानुना गाव हद्दतील, तालुका खामगाव, जि. बुलढाणा (संच क्र.-१) ह्या स्थावर मत्तेसाठी ठरवलेली इसारा अनामत रक्कम (इअर) आहे. रू. 15,00,000/- (रूपये पंधरा लाख मात्र) गट क्र. 38, जुना सर्व्हे क्र. 13, हिस्सा क्र. 1, जानुना गाव हद्दतील, तालुका खामगाव, जि. बुलढाणा - 444 303 (संच क्र.-२) ह्या स्थावर मत्तेसाठी ठरवलेली इसारा अनामत रक्कम (इअर) आहे. रु. 25,00,000/- (रुपये पंचवीस लाख मात्र. संदर्भित स्थावर आणि जंगम मत्तांचे निरीक्षण इच्छुक खरेदीदारांना 21.11.2023 रोजी स. 11.00 ते सं. 4.00 दरम्यान करता येईल. संच क्र. 1 व 2 साठी ई-निविदा (इअर) सादर करण्यासाठी अंतिम तारीख आहे 27.11.2023. ई-लिलावाची तारीख आहे 29.11.2023 संच क्र. 1 साठी दु. 02.00 ते दु. 3.00 आणि संच क्र. 2 साठी सं. 04.00 ते सं. 05.00.
3. एच 1 प्रस्ताव (उच्चतम बोलीदारी) अधिकृत परिसमापकांच्या अहवालामार्फत निश्चितीकरिता सम्मानीय उच्च न्यायालय, मुंबई यांचे समोर ठेवण्यात येतील.
4. सदर जंगम मत्तेची विक्री ही विक्रीच्या अटी आणि शर्तीनुसार करण्यात येईल.
5. विक्रीच्या अटी आणि शर्ती सम्मानीय उच्च न्यायालय, मुंबईची वेबसाईट www.bombayhighcourt.nic.in, निगम व्यवहार मंत्रालयाची www.mca.gov.in आणि रेलटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाईट https://olaucation.enivida.com. वर उपलब्ध करण्यात येतील.
6. ई-लिलावाची शुल्क रचना फी स्ट्रक्चर हे खालीलप्रमाणे रेल्वे मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत **विक्री एजंट** नाव मे. रेलटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड, मिनिरत्न सेंट्रल गव्हर्मेंट द्वारे करण्यात येईल.

i. ओएल कार्यालय आणि मंत्रालय यशस्वी लिलावाच्या बाबतीत सूचीबध्द एजन्सीला भरणा केलेल्या सेवेकरिता चुकते करणार नाही. ii. रू. 1 लाखापर्यंत विक्री मुल्याकरिता सूचीबध्द एजन्सीचे यशस्वी बोलीदारांच्या बोलीच्या 10% प्रभार राहील. iii. रू. 20,000/- ची निश्चित केलेली रक्कम ही रु. 20 लाखापर्यंत विक्री मुल्याकरिता यशस्वी बोलीदारांकडून सूचीबध्द एजन्सी वसुली करेल. iv. रु. 25,000/- ची निश्चित केलेली रक्कम ही रु. 20 लाखाच्या वरील परंतु रु. 50 लाखापेक्षा कमी विक्री मुल्याकरिता यशस्वी बोलीदारांकडून सूचीबध्द एजन्सी चार्ज करेल. v. रु. 30,000/- ची निश्चित केलेली रक्कम ही रु. 50 लाखाच्या वरील विक्री मुल्याकरिता यशस्वी बोलीदारांकडून सूचीबध्द एजन्सी वसुली करेल. vi. अयशस्वी बोलीदारांच्या बाबतीत (सूचीबध्द एजन्सीजना लागु नसलेल्या कारणाकरिता) ओएल सूचीबध्द एजन्सीला परिचालन खर्च परत करेल जी प्रत्येक तीन संचाकरिता रु. १०,०००/- पेक्षा जास्त नसेल. vii. विकण्यात येणाऱ्या मिळकतीवरील उपार्जित कोणतेही दायित्व/शुल्क/कर/उपकर संभाव्य बोलीदारांने पुर्ण करायचे आहे. viii. प्रस्ताव मुल्य हे टॅक्स कलेक्टेड ॲट सोर्स (टीसीएस), टॅक्स डिडक्टेड ॲट सोर्स (टीडीएस) इ. अशा करांना वगळून राहील आणि प्रस्ताव मुल्य ही निव्वळ रक्कम राहील. ix. कॅन्हिएए एम्पटरचे नियम लागु राहतील.

सही/-
दिनांक : 31 ऑक्टोबर, 2023 — (चंदन कुमार)
अधिकृत परिसमापक,
उच्च न्यायालय, मुंबई
5वा, मजला, बॅक ऑफ इंडिया बिल्डिंग, महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई 400001.
टेलीफोन: 22670024/ 22675008. ईमेल : samapakmum@yahoo.com

DNS BANK
डीबिवली नागरी सहकारी बँक लि.
(शेड्यूल्ड बँक दर्जाप्राप्त बँक)
वसुली विभाग : दुसरा मजला, "मधुकुंज", प्लॉट नं. पी-५२, एमआयडीसी, फेज-२, कल्याण शिळ रोड, सोनार पाडा, डोंबिवली (पूर्व)-४२१२०४.

शुद्धीपत्रक

दै. **नवशक्ती या वर्तमानपत्रामध्ये मंगळवार, दि.३१.१०.२०२३** रोजी मध्ये पृष्ठ क्रं.१८ वर **"कब्जा सूचना"** या मथळ्याखाली प्रसिध्द झालेल्या जाहिरातीचा संदर्भ घ्यावा. सदर जाहिरातीमध्ये नजरचुकीमुळे काही ठिकाणी चुका झालेल्या आहेत, त्या चुका सुधारुन कृपया खालीलप्रमाणे वाचाव्यात.

नजरचुकीमुळे छापून आलेला मजकूर	सुधारित वाचाववाचा मजकूर
थकबाकीची तारीख: ३१/१२/२०२१	**थकबाकीची तारीख:** ०१/०१/२०२२
थकबाकी रक्कम रुपयात: १२,३०,६९८.११	**थकबाकी रक्कम रुपयात:** ३५,४६,०६८.२९
बँकेकडे सरफेसी ॲक्ट अंतर्गत खालील नमुद तारण मत्तेचा प्रत्यक्ष कब्जा आहे.	बँकेकडे सरफेसी ॲक्ट अंतर्गत खालील नमुद **स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा** आहे.
मिळकतीचे वर्णन: २. (४६.४६ चौ. मी. बिल्टअप) दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ३०३.	**मिळकतीचे वर्णन:** २. (४६.४६ चौ.मी. बिल्टअप) दुसऱ्या **उंच** मजल्यावरील फ्लॅट क्र. ३०३.
लिलावाची तारीख आणि वेळ: २. बोयसर (पश्चिम)	**लिलावाची तारीख आणि वेळ:** २. **बोईसर** (पश्चिम)
मिळकतीचे वर्णन: ३. जिल्हा उल्हासनगर-खरब मधील गाव शिरगाव गावठाणम क्षेत्र मोजमापित तिसऱ्या मजल्यावरील क्षेत्र मोजमापित ४२५ चौ.फू. (बिल्टअप), तिसरा मजला, फ्लॅट क्र. १२.	**मिळकतीचे वर्णन:** ३. जिल्हा **उल्हासनगर-II** मधील गाव शिरगाव **गावठाण** क्षेत्र मोजमापित तिसऱ्या मजल्यावरील क्षेत्र मोजमापित ४२५ चौ.फू. (बिल्टअप), फ्लॅट क्र. १२.
मिळकतीचे वर्णन: ४. "विश्वसनीय स्वप्न नगरी"	**मिळकतीचे वर्णन:** ४. **"रिलायबल** स्वप्न नगरी"
लिलावाचे ठिकाण: १. विरार (पश्चिम)-४१०२०९ येथे स्थित बोईजिंग शाखा. २. बोयसर (प.)-४०१५०१ येथे स्थित बोयसर शाखा ३. बदलापूर (पूर्व)-४२१५०३ येथे स्थित कुळगाव शाखा	**लिलावाचे ठिकाण:** १. विरार (पश्चिम)-४०१३०३ येथे स्थित **बँकेची** बोईजिंग शाखा. २. **बोईसर** (प.)-४०१५०१ येथे स्थित **बँकेची बोईसर** शाखा ३. बदलापूर (पूर्व)-४२१५०३ येथे स्थित **बँकेची** कुळगाव शाखा
अटी आणि शर्ती: २. विरार (पश्चिम)-४१०२०९ येथे स्